# NSE

## नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लि.

''एक्स्चेंज प्लाझा'', सी-१, ब्लॉक-जी, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१, महाराष्ट्र, भारत

## जाहीर नोटीस

**सेबी (इक्विटी शेअर्सचे डिलिस्टिंग) नियमन, २०२१ चे नियमन ३२ (५) (ए) च्या परिभाषेमध्ये कंपन्यांच्या इक्विटी शेअर्सच्या अनिवार्य डिलिस्टिंगसाठी जाहीर नोटीस.**

याद्वारे सूचना देण्यात येते की सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (इक्विटी शेअर्सचे डिलिस्टिंग) नियमने, २०२१ चे नियमन ३२ (५) (ए) (''डिलिस्टिंग नियमने''), सिक्युरिटीज कॉन्ट्रॅक्ट (नियमने) अधिनियम, १९५६ चे कलम २१ए, सिक्युरिटीज कॉन्ट्रॅक्ट (नियमने) नियमन, १९५७ आणि उप-विधी आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडची ('एक्स्चेंज') नियमने यांच्या परिभाषेमध्ये ०५ जुलै २०२४ पासून पुढील कंपनीचे इक्विटी शेअर्स डिलिस्ट करण्यात आलेले आहेत.

**अनुपालन न केल्याने अनिवार्यपणे डिलिस्ट झालेली कंपनी.**

| कंपनीचे नाव न नोंदणीकृत कार्यालयीन पत्ता* | वाजवी मूल्य (रु.प्रति शेअर) | कंपनीच्या प्रवर्तकांचे नाव | कंपनीच्या प्रवर्तकांचा पत्ता** |
|---|---|---|---|
| सोनी सोया प्रोडक्ट्स लिमिटेड ऑफिस क्र. CS-1, पी स्क्वेअर इमारत, २ रा मजला, ३५०, गोयल नगर, इंदौर- मध्य प्रदेश-४५२०१६. | २४.९१/- | दिलीप कुमार सोनी | ३४, आशिष नगर, अदोष पडोश अपार्टमेंटच्या समोर, कनाडिया इंदौर-४५२०१६ मध्य प्रदेश, भारत जुने-२२बी १८/२७६ पलाय रोड, आर्य समाज नागदाजवळ, उज्जैन -४५६३३५, मध्य प्रदेश, भारत |
| | | जावेद अली | १२०/१, छोट्या मशिदीजवळ, जुना रिसाला इंदौर-४५२००२, मध्य प्रदेश, भारत |

*एमसीएच्या / एक्स्चेंजच्या नोंदींप्रमाणे उपलब्ध पत्ता

**एक्स्चेंजच्या नोंदींप्रमाणे उपलब्ध पत्ता

**टीप:**

अनिवार्य डिलिस्टिंगच्या परिणामांमध्ये पुढीलचा समावेश आहे:

ए. डिलिस्टिंग नियमनांच्या नियमन ३४ (१) च्या परिभाषेमध्ये, कंपनी, तिचे पूर्ण-वेळ संचालक, सिक्युरिटीज कायद्यांचे अनुपालन करण्यासाठी जबाबदार व्यक्ती, आणि त्यांच्यापैकी कोणाकडूनही प्रवर्तन करण्यात येणाऱ्या कंपन्या हे अशा डिलिस्टिंगच्या तारखेपासून दहा (१०) वर्षांच्या कालावधीसाठी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे सिक्युरिटीज मार्केट हाताळू शकणार नाहीत किंवा कोणत्याही इक्विटी शेअर्सचे लिस्टिंग करू शकणार नाहीत किंवा सिक्युरिटीज मार्केटमध्ये मध्यस्थ म्हणून काम करू शकणार नाहीत.

बी. रास्त मूल्य पॉझिटिव्ह (सकारात्मक) असणाऱ्या कंपनीच्या बाबतीत-

i. सदर कंपनीचे प्रवर्तक हे या संबंधित मान्यताप्राप्त स्टॉक एक्स्चेंजद्वारे प्रमाणित करण्यात आल्याप्रमाणे, या नियमनांच्या नियमन ३३ च्या उप-नियमन (४) चे अनुपालन करून सार्वजनिक भागधारकांना निर्गमन (एक्झिट) पर्याय प्रदान करेपर्यंत, सदर कंपनी व डिपॉझटरीज हे प्रवर्तकाद्वारे/प्रवर्तक समूहाद्वारे समूहाद्वारे धारण करण्यात आलेल्या कोणत्याही इक्विटी शेअर्सचे विक्री, तारण, इत्यादींद्वारे हस्तांतरण करू शकणार नाहीत आणि प्रवर्तक /प्रवर्तक समूहाद्वारे धारण करण्यात आलेल्या सर्व इक्विटी शेअर्ससाठी लाभांश, हक्क, बोनस शेअर्स, विभाजन इत्यादींसारखे कॉरपोरेट लाभ गोठवण्यात येतील.

ii. खंड (ए) मध्ये उल्लेख करण्यात आल्याप्रमाणे निर्गमन पर्याय प्रदान करेपर्यंत, अनिवार्य डिलिस्टेड कंपनीचे प्रमोटर, पूर्ण-वेळ संचालक, आणि सिक्युरिटीज कायद्यांच्या अनुपालनासाठी जबाबदार व्यक्ती हे कोणत्याही सूचीबद्ध कंपनीचे संचालक होण्यासाठी पात्रदेखील असणार नाहीत.

सी. सार्वजनिक भागधारकांना बाहेर पडण्याचा मार्ग देण्याची जबाबदारी कंपनीच्या प्रवर्तकांची आहे.

डी. डिलिस्टिंग नियमनांच्या नियमन ३३ (४) च्या परिभाषेमध्ये, कंपनीचा (चे) प्रवर्तक सार्वजनिक भागधारकांना त्यांचे शेअर्स बाळगण्याच्या पर्यायाच्या अधीन राहून, मान्यताप्राप्त स्टॉक एक्स्चेंजमधून डिलिस्टिंगच्या तारखेच्या तीन महिन्यांच्या आत, व्हॅल्यूअरद्वारे निश्चित करण्यात आलेले मूल्य प्रदान करून सार्वजनिक भागधारकांकडून डिलिस्टेड इक्विटी शेअर्सचे संपादन करेल.

ई. डिलिस्टिंग नियमनांच्या नियमन ३३ (५) च्या परिभाषेमध्ये, नियमन ३३ च्या उप-नियमन (३) च्या परिभाषेमध्ये प्रदेय असणारी किंमत ही उप-नियमन (४) अंतर्गत नमूद कालावधीच्या आथ सर्व भागधारकांना प्रदान करण्यात न आल्यास, अनिवार्य डिलिस्टिंग प्रस्तावाच्या अंतर्गत ज्यांनी आपले शेअर्स देऊ करतात, त्या सर्व भागधारकांना प्रतिवर्ष दहा टक्के दराने व्याज प्रदान करण्यासाठी प्रवर्तक उत्तरदायी असेल.

**कोणत्याही शंका डिलिस्टिंग समितीकडे पाठवण्यात येऊ शकतात, लिस्टिंग विभाग, नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड, एक्स्चेंज प्लाझा, सी-१, ब्लॉक-जी, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१. संपर्क क्र.:+९१ २२ २६५९८१०० (३२०१४), ई-मेल: vgandhi@nse.co.in, delisting@nse.co.in with cc to dl-insp-enf-delisting@nse.co.in.**

शंका वर नमूद ईमेल अॅड्रेसवर अनिवार्यपणे ईमेल करायला हव्यात. कोणत्याही निनावी शंका विचारात घेण्यात येणार नाहीत.

**स्थळ: मुंबई**
**दिनांक: ०३ ऑगस्टै, २०२४**

**नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडसाठी व त्यांच्या वतीने**

Nifty50